



सारसची भेट

जपानी लोककथा

लेखकद्वय:
स्टिव्ह, मेघमी बिडल

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन



फार फार वर्षांपूर्वी उत्तर जपानच्या उंच पर्वतरांगांमध्ये एक वृद्ध जोडपे राहात होते. ते खूप गरीब असले तरी साधेसरळ, दयाळू आणि उदार मनाचे होते. आजुबाजूच्या सर्व लोकांना त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांचे एकमेकांप्रती असलेले प्रेम आणि प्राणिमात्रांविषयी त्यांना असलेला आदर यांची जाणीव होती.

त्यांचे दिवस आनंदात जात होते. पण कधीतरी त्यांना एकटेपणाही जाणवत असे. आपल्याला एक मूल, विशेषतः मुलगी, असती तर फार बरे झाले असते असा विचार त्यांच्या मनात नेहमी येत असे.

दर दिवशी वृद्ध माणूस डोंगरात भटकून लाकडे गोळा करत असे. ही लाकडे जाळून तो कोळसे बनवत असे. महिन्यातून एकदा तो शहरात जाऊन ते कोळसे विकत असे. अशा रितीने तो आणि त्याची पत्नी आपला उदरनिर्वाह चालवत असत.

हिवाळ्याचे आगमन होताच पर्वतांवर पांढऱ्याशुभ्र मुलायम बर्फाचा वर्षाव होत असे. वृद्ध जोडप्याच्या घरासभोवती काही मैलांपर्यंतचा परिसर बर्फाच्या पांढऱ्याशुभ्र चादरीत लपेटल्यागत दिसत असे. आभाळावर काळ्या मेघांचे पडदे पडत आणि सरलेल्या ऋतुच्या साऱ्या खाणाखुणा, रंग त्यामागे लपत.

एका कडाक्याच्या सायंकाळी, भरपूर हिमवर्षाव होत असताना, गोठवून टाकणाऱ्या वाऱ्याचे झोत वाहात असताना, वृद्ध माणूस शहरात कोळसे विकून घरी परतत होता. दिवसभरच्या कामाने तो अतिशय थकून गेला होता. थंडीने कुडकुडत तो सावकाश पावले टाकत डोंगराळ वाटेवर चालत होता. त्याला आपले टुमदार घर, त्यातील आगीची धग आणि प्रेमळ पत्नी यांचे स्मरण होत होते. अचानक त्याला संकटात सापडलेल्या एका पक्ष्याचे करूण चित्कार ऐकू आले.

“कुठून येत असेल हा आवाज?” वृद्ध माणूस विचारात पडला.

त्याने हिमवर्षावाच्या पडद्यामधून पाहाण्याचा प्रयत्न केला. शिकाऱ्याने टाकलेले एक जाळे त्याला दिसले. त्यामध्ये एक सुंदर सारस जाळ्यात फसलेला असल्याचे त्याला दिसले. सारस जाळ्यातून सुटण्यासाठी जेवढी जास्त धडपड करत होता तेवढाच जास्त त्यात अडकत चालला होता. सारस या जाळ्यातून सुटणं अशक्य आहे, हे वृद्ध माणसाला जाणवले.

“बिच्चारा सारस! या अवस्थेत तुला कुणीही सहज पकडून नेईल,” सारसाकडे जात वृद्ध माणूस पुटपुटला. आपल्या गुडघ्यावर बसून तो जाळे सोडवू लागला.



“घाबरू नकोस. मी तुला मदत करतोय. तुझ्या पायाला जखम झालीय बहुधा,” वृद्ध माणूस प्रेमळ स्वरात म्हणाला.

वृद्ध माणूस म्हणाला ते सारसाला कळले असावे कदाचित. तो शांतपणे उभा राहिला. तो आपले डोके वृद्ध माणसाच्या गालाला घासून आनंदाचे, प्रेमाचे आवाज काढू लागला.

जाळ्यातून सुटल्यावर सारस आपले पंख फडफडवत पळू लागला आणि मग बर्फाळ आभाळात झेपावला. आभाळात उंच जाऊन तो परत फिरला, बहुधा वृद्ध माणसाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी. वृद्ध माणसाला पाहून तो मोठमोठ्याने ओरडू लागला.

“धन्यवाद,” असेच काहीसे म्हणत असेल तो, असे वृद्ध माणसाला वाटले.

सारसाने वृद्ध माणसाभोवती तीन फेऱ्या मारल्या आणि मग दूर उडून गेला. वृद्ध माणूस टक लावून त्याच्याकडे पाहात राहिला. सारसाची छबी लहानलहान होत गेली आणि पर्वतापल्याड लुप्त झाली.

थंडीचा गारठा वाढत चालला. पण वृद्ध माणसाचे मन एका वेगळ्याच उबदार भावनेने भरून आले.

“कुणाचे भले केल्यावर लोकांच्या मनात अशीच भावना उत्पन्न होत असावी,” त्याच्या मनात आले. आपण सारसाचा जीव वाचवून एक चांगले कृत्य केले आहे, याची जाणीव त्याला झाली आणि त्याला आनंद झाला.

संध्याकाळी आगीची ऊब घेत असताना वृद्ध माणसाने पत्नीला ही हकीकत सांगितली.

“तो सारस किती शांत आणि आनंदी दिसत होता!” तो म्हणाला.

मग त्याने शहरात दिवस कसा गेला, कोणकोण लोक त्याला भेटले वगैरे गप्पा मारल्या. ते झोपायची तयारी करू लागले तेव्हाच दारावर कुणीतरी ठकठक करू लागले.

“या कडाक्याच्या रात्रीत कोण आलं असेल आपल्याकडे?” वृद्ध स्त्रीने विचारले.”

वृद्ध माणूस दाराकडे गेला. दार उघडताच समोर एक सुंदर तरुणी पाहून तो चकित झाला. तिने आकर्षक पांढरा रेशमी किमोनो पोशाख परिधान केला होता. तिचे केस काळेभोर होते आणि कमरेपर्यंत रुळत होते. तिची त्वचा गुळगुळीत पांढऱ्याशुभ्र पोर्सिलेनसारखी मुलायम होती.



"यावेळी दारात येऊन तुम्हाला त्रास देतेय म्हणून क्षमा करा," ती अत्यंत मधुर स्वरात म्हणू लागली. "मी शेजारच्या नगरात राहाणाऱ्या माझ्या नातलगांना भेटायला चाललेय. पण या भयंकर हिमवादळात मी रस्ता चुकलेय. तुम्ही मला एका रात्रीपुरता आसरा द्याल का?"

तिच्या ओठांवर नाजूर, मंद स्मित होते. ती थंडीने कडकुडत आहे आणि तिचे कोमल हात थरथरत आहेत हे वृद्ध माणसाच्या आणि त्याच्या पत्नीच्या लक्षात आले.

"ये मुली, आत ये. आगीजवळ बसून ऊब घे," वृद्ध माणसाला तिची दया आली. "तू रात्री इथे राहिलीस तर आमची काही हरकत नाही."


"तुला हवा तितका वेळ तू राहू शकतेस आमच्याकडे," वृद्ध स्त्री जिव्हाळ्याने म्हणाली.

"तुमच्या औदार्याबद्दल खूप आभारी आहे. मी खरंच हवा तितका वेळ राहू शकते का इथे?" आपल्या कपड्यावरचा बर्फ साफ करत आणि पाय पुसत तरुणीने विचारले.

"हो, तुला हवा तितका वेळ राहा इथे," वृद्ध माणूस म्हणाला.

"आगीजवळ येऊन बस, म्हणजे कपडे सुकतील तुझे," वृद्ध स्त्री म्हणाली. "आपण सकाळी आणखी गप्पा मारू. आता रात्रभर छान झोप घेऊ आधी."

पुढल्या दिवशी एवढा बर्फ पडला की दार उघडणेसुद्धा अशक्य झाले. सलग पाचसहा दिवस बर्फ पडत राहिला आणि तरुणी तिथेच राहिली. वृद्ध जोडप्याने आपल्याला केलेल्या मदतीची परतफेड कशी करावी, या विचारात ती पडली.



“एक विनंती आहे तुम्हाला,” ती वृद्ध जोडप्याला म्हणाली.

बोलता बोलता ती थांबली. वृद्ध जोडप्याला ती आपल्या मुलीसारखी वाटू लागली होती. त्यांनी तिला मन मोकळे करण्यास सांगितले.

“अगं बोल ना,” ते म्हणाले. “तुला काही मदत हवीय का?”

तरुणीने त्यांना आपली कहाणी सांगितली. तिने आपले आईवडील गमावले होते. ज्या रात्री तिने वृद्ध जोडप्याच्या घराचे दार ठोठावले, त्यावेळी ती जवळच्याच नगरातील नातलगांकडे राहायला चालली होती. पण हिमवादळात ती रस्ता चुकली होती.

मग ती म्हणाली, “माझे नातलग माझ्या आईवडिलांची जागा घेऊ शकत नाहीत. ते तुमच्यासारखी माया करू शकत नाहीत माझ्यावर. मी पूर्वी नक्कीच काही पुण्यकर्म केलं असावं, ज्यामुळे मी तुमच्या दारावर येऊन पोहोचले. मी इथेच तुमची मुलगी बनून राहू शकते का?”

“आईबापांशिवाय किती एकटंएकटं वाटत असेल तुला!” वृद्ध जोडपे म्हणाले. “तू खूप दयाळू आणि समजूतदार मुलगी आहेस. तू आमची मुलगी बनलीस तर आम्हाला आनंदच होईल.”

त्यांच्या प्रेमळ शब्दांमुळे तरुणी त्यांच्यासोबत त्यांची मुलगी होऊन राहू लागली. तिच्या या निर्णयामुळे त्या जोडप्याला किती आनंद झाला, हे तिला माहीत नव्हते.

हिवाळा सरून वसंत ऋतू सुरू झाला. चेरीच्या झाडावर फुललेल्या फुलांनी सारा परिसर गुलाबी रंगाने बहरला. तेव्हाच तरुण मुलीने वृद्ध जोडप्याला पुन्हा एक विनंती केली.

“आपल्या घरात चरखा आहे का? मला कापड विणायचंय.”

“हो, आहे एक,” वृद्ध माणूस म्हणाला. “माझी पत्नी तरुणपणी कापड विणायची त्यावर.”

असे म्हणत, तो तिला चरखा असलेल्या खोलीत घेऊन गेला. तिथे रंगीबेरंगी धाग्यांच्या रिळांनी भरलेले डबेसुद्धा पडले होते.

तरुणी वृद्ध माणसाला म्हणाली, “एक महत्त्वाची विनंती आहे तुम्हाला. मी या खोलीत दार बंद करून चरख्यावर कापड विणत बसेन. मला वचन द्या की त्यावेळी कुणीही कधीही या खोलीचं दार उघडायचं नाही.”

वृद्ध माणसाने तिला वचन दिले की ते त्या खोलीत अजिबात डोकावणार नाहीत. पण त्याचवेळी तिची ही विनंती त्याला विचित्र वाटली.

“आता मी चरख्यावर बसते. तुम्ही बाहेरून दार बंद करून घ्या,” तिने प्रेमळ स्वरात म्हटले.

तरुणी सकाळपासून रात्रीपर्यंत चरख्यावर काम करत राहिली. तिने अध्येमध्ये ना विश्रांती घेतली, ना जेवण घेतले. दाराबाहेर वृद्ध जोडप्याला चरख्याचा लयबद्ध आवाज ऐकू येत होता - क्रिक, टॅप, क्लॅक.... क्रिक, टॅप, क्लॅक.... क्रिक, टॅप, क्लॅक....

चौथ्या दिवशी चरख्याचा आवाज अचानक बंद झाला. काय झाले याचा अंदाज वृद्ध जोडप्याला येण्याआधीच तरुणी दारात येऊन उभी राहिली. तिच्या हातात कापडाची एक गुंडाळी होती.



"किती सुंदर आहे कापड!" ते उद्गारले. "लग्न झाल्यानंतर एवढ्या वर्षांत आम्ही असं कापड पाहिलेलं नाही."

"हे मी तुमच्यासाठीच विणलंय," मुलगी म्हणाली. "उद्या बाजारात जाऊन हे विका. याची नक्कीच चांगली किंमत मिळेल."

पुढल्या दिवशी वृद्ध माणूस शहरात गेला आणि ओरडू लागला, "कापड! कापड! कोण माझं सुंदर कापड विकत घेईल?"

ते कापड बघितलेला प्रत्येकजण त्याचा दर्जा आणि त्यावरील कलाकुसर पाहून चकित झाला.

कापड पाहून एकजण म्हणाला, "बाबा, हे कापड साधं नाही, जरतारी आहे. आयुष्यभरात मी अशी नाजूक कलाकुसर पाहिलेली नाही. हे कापड महालात न्यायला हवं, म्हणजे सरदारसुद्धा ते पाहू शकेल."


ते शानदार कापड पाहून सरदार म्हणाला, "हे खरोखरच फार सुंदर आहे. या कापडाचा मी आकर्षक किमोनो शिवून घेईन, माझ्या मुलीसाठी. मला विकत हवंय हे कापड."

सरदाराने वृद्ध माणसाला कापडाचा मोबदला म्हणून भरपूर सोन्याची नाणी दिली.

मग तो म्हणाला, "बाबा, येत जा अध्येमध्ये. तुमचं कापड इतकं सुंदर आहे की तुम्ही आणाल तेवढं कापड मी विकत घेईन."

घरी पोहोचताच, वृद्ध माणसाने पत्नीला आणि मुलीला, सरदाराला ते कापड एवढ्या जास्त किंमतीत कसे विकले, याबद्दल सांगितले.





वसंत ऋतूनंतर ग्रीष्म ऋतूचे आगमन झाले. वर्षा ऋतूने परिसरातील जमिनीवर विविध रंग विखुरले, कुठे *मॉर्निंग ग्लोरी* फुलांचे निळे-गुलाबी रंग तर कुठे *आयरिस* आणि *हायड्रेन्जिया* फुलांचे गहिरे निळे-जांभळे रंग.

पण तरुण मुलगी ऋतुंच्या या विलोभनीय बदलांपासून अनभिज्ञ होती. कारण ती सकाळपासून रात्रीपर्यंत अविरत, काहीही न खाता फक्त काम करत होती. बंद दाराबाहेरून वृद्ध जोडप्याला पुन्हा चरख्याचा लयबद्ध आवाज येऊ लागला - क्रिक, टॅप, क्लॅप.... क्रिक, टॅप, क्लॅप.... क्रिक, टॅप, क्लॅप....

खोलीत चरख्यावर बसलेली मुलगी कशी काम करत असेल, याची कल्पना वृद्ध जोडप्याने मनात केली. त्या खोलीच्या आत बघण्याची तीव्र इच्छा दडपून टाकणे त्यांना अवघड जात होते. तिला काम करताना त्यांना बघायचे होते. ती एवढे सुंदर जरतारी कापड कशी बनवते, याचे त्यांना कुतूहल होते. पण ती खोलीत चरख्यावर काम करत असताना आत डोकवायचे नाही, असे वचन आपण तिला दिले आहे, याची आठवण वृद्ध माणसाला सतत होत असे.

काही दिवसांनी ती खोलीबाहेर आली. ती कमजोर आणि थकलेली दिसत होती. पण तिच्या हातात एक जरतारी कापड होते. आधीच्या कापडापेक्षा ते जास्त आकर्षक होते. वृद्ध माणूस ते कापड घेऊन शहरात गेला आणि ते सरदाराला दाखवले.

सरदार ते कापड पाहून अतिशय प्रसन्न झाला. आधीपेक्षा जास्त द्रव्य देऊन त्याने ते कापड खरेदी केले.

वृद्ध माणूस महालातून निघाला तेव्हा सरदार म्हणाला, "बाबा, ग्रीष्म ऋतूच्या शेवटी माझ्या मुलीचं लग्न आहे. तिच्या लग्नात घालायच्या किमोनोसाठी तुम्ही एक खास जरतारी कापड बनवू शकाल?" वृद्ध माणसाने आनंदाने त्यांची विनंती मान्य केली.

सरदाराकडून मिळालेल्या धनराशीमुळे वृद्ध जोडपे श्रीमंत झाले. त्यांचे आयुष्य आरामदायी झाले. पण दिवस सरू लागले तसे मुलगी अशक्त होत गेली. तिच्या अंगातील ताकद क्षीण होत गेली.

वृद्ध माणसाला तिची काळजी वाटू लागली. एकदा त्याने तिला विचारले, "तुला बरं नाही वाटत का? तू अहोरात्र कष्ट करतेयस. आता थोडी विश्रांती घे."

"अहो, बरीय मी," ती मंद स्मित करत उत्तरली. "खरंच, आता थोडंसच कापड विणायचं राहिलंय. पण माझी एक विनंती आहे. पुन्हा एकदा वचन द्या की मी आत काम करताना तुम्ही दोघं खोलीचं दार कधीही उघडणार नाही."

वृद्ध माणसाने पुन्हा एकदा वचन दिले की ती काम करत असताना ते खोलीचे दार उघडणार नाहीत. पण गेल्या वेळेप्रमाणे याहीवेळेला त्याला तिची विनंती विचित्र वाटली.



त्या रात्री वृद्ध जोडपे आगीजवळ बसून ऊब घेत होते तेव्हा वृद्ध माणसाने मुलीच्या तब्येतीबद्दल चिंता व्यक्त केली.

“मलासुद्धा तिची काळजी वाटते,” त्याची पत्नी म्हणाली. “जरा चरख्याचा आवाज ऐका. जणू तो सांगतोय की हे काम खूप कष्टाचं आहे.” मुलीच्या खोलीजवळ जात वृद्ध स्त्री म्हणाली, “मी आत डोकावू का?”

“नको,” तिचा पती म्हणाला. “मी तिला दोनदा वचन दिलंय की ती काम करत असताना आपण खोलीत डोकवायचं नाही.”

पण वृद्ध स्त्री हट्टाला पेटली, “फक्त एकदा डोकावते. तिला कळणारसुद्धा नाही.”

असे म्हणत, तिने खोलीची खिडकी थोडीशी उघडली. पण आतले दृश्य पाहाताच, आश्चर्याने तिच्या तोंडून अस्फुटशी किंकाळी बाहेर आली.

“काय झालं?” तिच्याजवळ लगबगीने येत वृद्ध माणसाने विचारले. “काय दिसलं तुला?”

“तिथे एक....” वृद्ध स्त्रीच्या तोंडून शब्दच फुटेना.

वृद्ध माणसाने खिडकीतून आत पाहिले आणि तोसुद्धा अवाक् झाला. कारण चरख्यापाशी तरुण मुलीऐवजी एक सुंदर पांढराशुभ्र सारस होता. सारस आपले डोके खाली झुकवून चोचीने आपल्या शरीरातील एक-एक पीस उपटून काढत होता आणि कापडामध्ये विणून टाकत होता.

“ही मुलगी एक सारस आहे!” वृद्ध माणूस हळूच म्हणाला. “बघ, सुंदर कापड बनवण्यासाठी ती स्वत:चं पीस उपटतेय. पीस उपटलंय ती जागा मोकळी आहे, दिसतंय तुला?”

वृद्ध जोडपे हळूच खिडकी बंद करून दबक्या पावलाने तिथून निघून गेले. जे पाहिले त्यातून ते स्वत:ला अद्याप सावरू शकले नव्हते.





पुढल्या दिवशी सायंकाळी तरुण मुलीने खोलीचे दार उघडले. ती खूपच थकली होती, अशक्त झाली होती. पण तिच्या हातात एक अत्यंत सुंदर जरतारी कापड होते.

“तुमच्यासाठी ही माझी अत्यंत प्रेमपूर्वक आणि आदरपूर्वक अंतिम भेट,” ती वृद्ध जोडप्यासमोर बसत म्हणाली. “सरदारांनी विनंती केल्यानुसार, मी त्यांच्या मुलीला लग्नात किमोनो घालण्यासाठी हे जरतारी कापड विणलंय.”

वृद्ध जोडप्याला काय बोलावे ते कळेना. काल रात्री त्यांनी जे पाहिले ते त्यांच्या डोळ्यांसमोर तरळले.

तरुणी पुढे म्हणाली, “गेल्या काही महिन्यांमध्ये तुम्ही माझ्यासाठी जे काही केलंत त्यासाठी मी तुमची शतशः ऋणी आहे. पण आता मला माझ्या कुटुंबीयांकडे जायला हव.”

वृद्ध माणसाच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. त्याने पत्नीकडे नजर वळवली तेव्हा तीसुद्धा रडत असल्याचे त्याला दिसले.

“बाबा,” वृद्ध माणसाचा हात हातात घेत, त्याला दिलासा देत मुलगी बोलू लागली, “कडाक्याच्या थंडीत रात्री तुम्ही मला जाळ्यातून सुटका करून वाचवलंत, तोच सारस आहे मी. काही करून मला तुमच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करायची होती. म्हणून मी तरुण मुलीचं रुप घेतलं. तुमची मदत करण्यासाठी मी जरतारी कापड विणलं. पण काल रात्री तुम्ही मला दिलेलं वचन मोडलंत आणि माझं गुपीत उघड झालं. आता मला इथे राहाता यायचं नाही. हिवाळ्याचं आगमन होण्याआधी मला दक्षिणेकडे जायला हवं.”

वृद्ध जोडप्याकडे एक उदास नजर टाकत तरुणी पळत घराबाहेर पडली. पळतापळता तिने आपले बाहू पसरले आणि क्षणभरातच तिचे रुपांतर पांढऱ्याशुभ्र सारस पक्ष्यामध्ये झाले. आपले पंख फडफडवून सारस आभाळात उडाला.


“अलविदा. आमची मदत केल्याबद्दल तुझे खूप आभार,” वृद्ध जोडपे उडत्या सरसाकडे पाहात म्हणाले.

सारसाने त्यांच्या डोक्यावरून तीन चकरा मारल्या. हिवाळ्याच्या त्या रात्रीसारखंच, सारसाने मागे वळून वृद्ध जोडप्याचे अंतिम दर्शन घेतले आणि तो मोठ्याने ओरडला.

“अलविदा आणि आभार,” असाच काहीसा अर्थ होता त्याचा.

उडत दूर गेलेल्या सारसाची छबी लहानलहान होत गेली. हळूहळू ती आभाळात पसरलेल्या मावळत्या सूर्याच्या तेजामध्ये लुप्त झाली.





काळ सरत गेला. ग्रीष्म ऋतूच्या तप्त रंगछटा शरद ऋतूच्या सौम्य, ऊबदार रंगछटांमध्ये रुपांतरित झाल्या. हवा स्वच्छ आणि निर्मळ झाली, पिके बहरली आणि पक्षी दक्षिणेकडे जाऊ लागले. सायंकाळी वृद्ध जोडप्याने आभाळाकडे नजर टाकली. वर एक एकाकी सारस उडत होता. साहजिकच, त्यांच्या मनात विचार आला....अरे, ही आपलीच तर मुलगी नव्हे!

समाप्त

